Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 3.009, (GIF) - 0.676 (2013)
Special Issue 24 December 2017
UGC Approved No. 40107 & 44117

# वाचन व अभिरूची यांचा सहसंबंध आणि वास्तव

प्रा. डॉ. जयश्री शास्त्री
लोकमान्य महाविद्यालय, वरोरा
मो.९३७१४६७५९३

जगात कोणत्याही संस्कृतीतील अभिरूची संपन्नता ही तेथील सुदृढ समाजाचे द्योतक आहे असे म्हणता येईल. कारण अभिरूची ही मनाची विशिष्ट ठेवण किंवा शक्ती असे मानले जाते. अभिरूची म्हणजे सौंदर्य ग्रहण करण्याची किंवा वस्तूतील मर्मग्रहण करण्याची क्षमता असते आणि तिचा संबंध मानसाची रसिकता, सहृदयता यांच्याशी असेल तर सामूहिकरित्या जगातील त्या–त्या मानवी समाजाची रसिकता, सहृदयता ही त्यांची अभिरूची घडविते आणि अशी अभिरूची प्रत्येक देशाची सांस्कृतिकता चिरःकाल टिकविण्यास कारणीभूत ठरते असे म्हणता येईल. त्यासाठी सर्वप्रथम अभिरूची म्हणजे काय ? ते समजून घ्यायला हवे.

**अभिरूचीचा अर्थ काय ?**

रूची या शब्दाला अभि हा उपसर्ग जोडून तयार होणारा अभिरूची हा शब्द होय. तो 'रूची' या शब्दाचेच अर्थदृष्ट्या वेगळेपण, पृथगत्व सांगणारा आहे.[१] तसे पाहता 'रूची' हा शब्दही रस, चर्वणा, आस्वाद इ. शब्दांप्रमाणे पाकशास्त्रातून साहित्यशास्त्रात आलेला आहे. त्यामुळे आवड हा त्याचा प्राथमिक अर्थ आहे. आवड–नावड हाच माणसातील एक उपजत धर्म असल्यामुळे एखाद्या गोष्टीबद्दल अनुकुल–प्रतिकूल प्रतिक्रिया यातूनच निर्माण होते. पण केवळ अशी आवड–निवड म्हणजे अभिरूची नसते असे प्रा. अ.वा. कुळकर्णी यांचे मत आहे. मॅकडूगल या मानसशास्त्रज्ञाच्या मते, विशिष्ट आवड (test) आणि मनोवृत्तीतील विशिष्ट स्थिरभाव यांचा समन्वय अभिरूचीत असतो. प्रा. रा.श्री. जोग यांनी ''अभिरूची म्हणजे विचारपूर्वक अनुकूल सहजसंवादी प्रतिक्रिया''[२]असे म्हटले आहे.

मुलभूत अभिरूची अविकृत किंवा असंस्कारित अवस्थेमध्ये फार काळ राहू शकत नाही असे म्हटले जाते. कारण तिच्यावर बाहेरून चांगले–वाईट संस्कार परिणाम होऊन मूळ अभिरूचीला निराळे वळण लागणे सहज शक्य असते. प्राथमिक पहिल्या संस्कारांनी मिळालेले हे वळण शेवटपर्यंत कायम राहण्याची शक्यता असते. कित्येक वेळा व्यक्तीची मूळ अभिरूची प्रभावी राहते. कसेही असले तरी मनुष्य प्रौढझाला की त्याची अभिरूची स्थिर स्वरूप धारण करते, असे म्हणायला हरकत नसते. मग त्याची मते किंवा अभिप्रायही स्थिर किंवा ठराविक असे रूप घेऊ लागतात. मग स्वतःच्या मतांचे कारण देऊन मंडन केले जाते. अशा वेळी अभिरूची आणि अभिप्राय किंवा मत फारसा भिन्न दिसत नाही. मात्र ते भिन्न आहे हे विसरता कामा नये. उदाहरणार्थ प्राचीन वाङ्मयातून भक्तीचे संस्कार सतत होत गेल्याने भक्तिपर वाङ्मय असे लिहिले. स्वाभाविकच आपली मते ही या वाटण्यावरून बनत गेली. एकूणच रा.श्री. जोग म्हणतात त्यानुसार ''जेणे भवबंध तुटे । त्या नाव ग्रंथ ।।'' वाङ्मयापासून बोध मिळाला पाहिजे असे संस्कार सतत होत गेल्याने आपल्या अभिरूचीस तेच वळण लागते व नंतर बोध देणारेच वाङ्मय चांगले असे वाटू लागते.''[३] अशाही प्रकारे अभिरूची आकार घेते.

**अभिरूचीमधील वैविध्य :**

वास्तविक कलाकृतीमधील आशयसौंदर्य आणि अभिव्यक्तिसौंदर्य ह्यासाठी सौंदर्याचा, मर्माचा वेध घेण्याची समज अभिरूचीत अंतर्भूत असते. कलाभिरूचीत सर्वात महत्वाचा मानला जाणारा गुण म्हणजे सौंदर्यदृष्टी, सौंदर्यानुभूतीची क्षमता होय. त्यामुळे साहित्यकृतीत नेमके काय सांगितले आहे आणि ते कसे सांगितले आहे हे समजून घेण्याची पात्रता म्हणजेच साहित्यिक अभिरूची. साहित्यकृतीतील सौंदर्य आणि लालित्य नेमकेपणाने हेरण्याची क्षमता किंवा साहित्यातील "साहित्यत्व अनुभवण्यास येण्यासाठी वाचक हा अभिरूचिसंपन्न असावा लागतो. त्यामुळे ही साहित्यिक अभिरूची कशी असावी याबाबत कलात्मक अभिरूचीचे विशेषत्व स्पष्ट करताना प्रा.गो.म. कुलकर्णी यांनीअभिरूची ही १) साहित्य आणि साहित्यशास्त्राच्या संस्कारांनी कमावलेली, २) आस्वादकाला त्याच्या लौकिक 'स्व' चा विसर पाडणारी, ३) लौकिक उपयोगितेची सूत्रे साहित्यकृतीला किंवा तिच्या आस्वादाला न लावू देणारी, ४) कलामूल्ये आणि जीवनमूल्याचे भान ठेवणारी ५) योग्ययोग्यतेचा औचित्य–विवेक राखणारी, ६) चांगले–वाईट यातील नेमका भेद जाणण्याची क्षमता असणारी"[४] एकूण उपरोक्त वैशिष्ट्यांनी युक्त अशी सौंदर्यदृष्टीपूर्ण अभिरूची घडते.

**शास्त्रात न बांधता येणारी अभिरूची :**

जुन्या संस्कृत काव्यमीमांसकांनी पूर्वसंस्कार हेच अभिरूचीच्या निर्मितीचे कारण दिले आहे जिचा संबंध माणसाची रसिकता सहृदयता, सौंदर्यग्रहणाशी जोडीला आहे. याचा अर्थ ती प्रयत्नांनी माणसाच्या ठिकाणी निर्माण होऊ शकत नाही. कारण कलांची आवडल ही सर्वच व्यक्तींमध्ये नसते. अशी आवड अभिरूची जन्मजातच असावी लागते. असे अभ्यासकांचे मत आहे. कारण याबाबतीत सुसंपन्न, संस्कारसंपन्न, सुशिक्षित असे कोणतेही वातावरण अभिरूचीच्या निर्मितीसाठी उपयोगी ठरत नाही. अन्यथा अशी कोणतीही परंपरा नसलेल्या घरात अण्णभाऊ साठे, बहिणबाई चौधरी किंवा आनंद यादव यासारखे प्रतिभावंत निर्माण झालेले दिसले नसते.

परंतु आणखी एक विचार अत्यंत महत्वाचा मानला जातो की अभिरूची ही जन्मजात नसली तरी ती विकासक्षम असते. सर्वसाधारण स्वरूपातील समाजाची सामूहिक अभिरूची दिसते. कोणत्याही साहित्यप्रकाराचे सुरूवातीच्या काळातील रूप कालांतराने बदलतेच. जसे पूर्वीच्या हरिभाऊ आपटेंच्या काळातील आणि अगी आताची अद्ययावत कादंबरी यातील बदललेले रूप व त्याच्याशी संलग्न, सामूहिक अभिरूची यातील बदल सहज लक्षात घेण्यासारखा. तसेच तत्कालीन विष्णुदास भावेंपासून तर, एकच प्याला, घाशीराम कोतवाल आणि अद्ययावत दोन अंकी, एकांकिका अशी बदलत गेलेली नाटयाभिरूची यातील बदल सहज लक्षात येण्यासारखा होय. आज पूर्वीसारखे पाच–पाच अंकी नाटके बघण्यास कुणाकडेही वेळ नाही, किंबहुना त्याबाबतची उदासीनता आढळते. त्यामगे बदललेले नाट्यलेखन, बदललेली रंगभूमी, बदललेले नाट्यप्रयोगांचे स्वरूप अशी कितीतरी कारणे दिसतात.

मराठीत अभिरूचीचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी प्रा. रा.श्री. जोगांनी पुढील काही सूत्रांचा उल्लेख केला आहे. त्यातील काही महत्वपूर्ण सूत्र म्हणजे –

१. लेखन वाङ्मयपद्धतीने झाल्यास अभिरूची कळणे सोपे होते.
२. प्रतिभा म्हणजे अभिरूची नव्हे.
३. वाङ्मयाभिरूची मुख्यत: प्रतीत होते ती ललित वाङमयातून.
४. वाङ्मयनिर्मात्याची अभिरूची लेखनप्रक्रियेतून व्यक्त होते.

ISSN : 2348-7143
December 2017

५. लेखक सत्प्रवृत्तीचा आहे म्हणून ते वाङ्मयदृष्ट्याही श्रेष्ठ असते असे नव्हे.
६. अभिरूची नवनिर्मिती करून शकत नाही परंतु निर्मितीला वळण लावते.
७. अभिरूची ही एक चंचल वृत्ती आहे. चंचल आणि लहरी. तिचे शास्त्र बनविणे कठीण.
८. जीवनातील व्यावहारिक अभिरूची आणि वाङ्मयातील अभिरूची यात फारशी तफावत नसते.
९. आशय आणि अभिव्यक्ती या दोहोंवरील अभिरूचीचा परिणाम होतो."

व्यक्तिगत स्तरावरील अभिरूचीबाबत असे दिसते की, काव्यशास्त्राचा अभ्यास, तत्संलग्न अशा इतर शास्त्राचा अभ्यास काव्यग्रंथाचे वाचन इ. वाचन यामुळे अभिरूचीच्या मूळ स्वरूपात फरक पडत जातो. ती अधिक सूक्ष्म, चोखंदळ, मर्मग्राही बनत जाते. अभिरूचीमुळे व्यक्तिच्या चांगल्या–वाईटाच्या कल्पना आणि आवडीनिवडी यात बदल होतो. त्या वाचकाला जास्त संदेशनक्षम आणि सुक्ष्म व परिपक्व करतात. त्याचा परिणाम म्हणजे एखादी कादंबरी जी लहानपणी आवडेनाशी असते ती मोठेपणी आवडू लागते. अ. वा. कुळकर्णी यांनी, "साने गुरूजींचे कथासाहित्य प्रौढावस्थेत परिणामकारक वाटत नाही, तसेच वा.म. जोशी यांच्या कादंबऱ्या लहान वयात समजत नाहीत याचे कारण म्हणजे बालपणीची अभिरूची, नंतरच्या काळात तिच्यावीर होत गेलेले संस्कार आणि तिने त्यातून घेतलेली वळणे हेच होय" असे मत व्यक्त केले आहे. खरोखच असा अनुभव विविध वयात वाचन करतांना आपल्याला आलेला असतो.

**अभिरूचीवर प्रभाव टाकणारे घटक–**

तसे पाहता 'भावयति इति सौंदर्यम्' या न्यायाने ज्याला जे आवडते आणि ज्याची जशी अभिरूची त्यानुसार कलेचे निर्माण आणि त्याचा आस्वाद घेतला जाताना दिसतो. ज्याप्रमाणे काही जणांला शास्त्रीय संगीत आवडते तर काहींना लोकसंगीत तसेच काहींना कादंबरी चा दीर्घ आवाका तर काहींना कथा–ललित साहित्य अथवा आपल्या आवडीनुसार काव्य आवडते. वास्तविक १) सांस्कृतिक पर्यावरण २) आर्थिक पर्यावरण आणि ३) वाङ्मयीन पर्यावरण ही सर्व अभिरूची भिन्नतेची कारणे होत. यामुळे अभिरूची आणि वाचनातील सहसंबंध निर्माण होतो.

प्रा. अ.वा. कुळकर्णी म्हणतात, "त्यानुसार प्रत्येक समाजाची एक विशिष्ट संस्कृती असते आणि ती म्हणजे परंपरेने निश्चित केलेली. त्या त्या समाजाची एक विचार पद्धती आणि आचारपद्धती असते. व्यक्तीच्या आवडीनिवडी, विचारांच्या दिशा, दृष्टिकोण, जगण्याच्या पद्धती या बहुतांश सांस्कृतिक परंपरा–नियम असतात."[6] या विधानावरून नक्कीच लक्षात घेता येते की, ज्यांच्या परिवारात सांस्कृतिक पर्यावरण असते त्या जाणिवांचा संस्कार त्यांच्या अभिरूची घडणीवर झाला असतो.

आर्थिक पर्यावरणाचाही अभिरूची संपन्न करण्यात वाटा आहे. कारण ज्या समाजाला आपली सर्व ऊर्जा गरजांच्या पूर्तीसाठीच खर्चावि लागतात त्यामुळे त्या समाजाची सांस्कृतिक प्रगती फारशी झालेली दिसत नाही. म्हणूनच शिक्षण, ग्रंथनिर्मिती, विद्याव्यासंग कलाक्षेत्रे, त्यातील कामगिरी आणि विशेषत: निर्मिती–आस्वाद यासाठी आवश्यक ते स्थैर्य व स्वास्थ्य यांचा आर्थिक पर्यावरणाशी निकटचा संबंध असतो असे म्हणता येते.

वाचन आणि अभिरूची यांचा सहसंबंध विचारात घेतांना वाङ्मयीन पर्यावरण हा महत्वपूर्ण घटक लक्षात घ्यावा लागतो. ज्यातून लेखक व वाचक दोघेही घडतात. उदा. भारतासारख्या देशात अगदी इतिहासपूर्व काळापासून वाङ्मयनिर्मिती झाल्याने एक स्वतंत्र अशी परंपरा निर्माण झाल्याचे दिसते. जसे संस्कृत भाषेतील महाकाव्ये आणि नाटके एवढेच नव्हे नाट्य व काव्य विषयीचे टीका साहित्यही विपुल

प्रकाशन [illegible] झाले. कालिदासाची 'नाटके', भरतमुनीचे नाट्यशास्त्र 'केव भामहाचे 'काव्यशास्त्र' यांचा [illegible] [illegible] या सर्वांतून एक साहित्याभिरूचीही बरोबर चालत आली आणि वाड्मयीन पर्यावरण निर्माण झाले. पुढे मुद्रण कलेच्या काळात मराठीतील ग्रंथलेखनाला शासनाकडून उत्तेजन मिळू लागले, प्रसार वाढला. नवीन इंग्रजी शिकलेल्यांना भिन्न भिन्न वाड्मयप्रकारांची ओळख झाली जसे, निबंध, कथा, कादंबरी, नाटक, भावकाव्ये, इ. साहित्यप्रकारांचा परिचय झाला, नियतकालिके निर्माण झाली. तसेच साहित्य आणि समीक्षा या दोन्हींची प्रगती या काळात झाली; परिणामी एक आवश्यक असे वाड्मयीन पर्यावरण सिद्ध होत गेले.

एकूणच अभिरूचीवर सांस्कृतिक, आर्थिक आणि वाड्मयीन वातावरणाचा खूप मोठा परिणाम होतो असे लक्षात येते.

**वाचन व अभिरूची :**

वाचन ही अभिव्यक्ती आहे प्रगटीकरण आहे. अभिरूची पासूनच अभिव्यती निर्माण होते असे म्हटले जाते. परंतु अभिव्यक्तीची वारंवार कृती केली गेल्यास अभिरूची निर्माण होते असाही विपर्यास आढळतो.

''बहुश्रुत सन्मित्राच्या सहवासापासून होणारे बहुतेक फायदे चांगल्या वाचनापासून होऊन शिवाय त्या सहवासापासून न होणारे असे अनेक फायदे होतात. वाचन हे स्वल्पखर्चाने किंवा थोडयाशा अंगमेहनतीने सर्वास प्राप्त होण्यासारखे आहे.''[७] असे आगरकरांनी म्हटले आहे. त्यांच्या मते, 'ज्याला एकदा चांगल्या वाचनाचा नाद लागला त्याच्या करमणुकीला सीमा नाही.'

अशाप्रकारच्या वाचनाची गोडी लागलेल्या प्रत्येकाचे वाचन अभिरूचीनुसार घडत जाते ही वाचनाची पुढली पायरी होय असे म्हणता येते. कारण अभिरूची व्यापारावर तत्कालीन, समकालीन सामूहिक अभिरूचीचे नियंत्रण असते. कोणत्याही कलानिर्मात्यासमोर शेवटी समकालीन वास्तवातील समाज आणि या समाजाची अभिरूची प्राधान्याने डोळ्यासमोर असते. कारण स्वाभाविकच हा कलानिर्माता हा या समाजाचा, त्यातील अभिरूचीचा एक अविभाज्य घटक असतो. वाचकही समकालीन कलानिर्मितीत स्वाभाविकपणे रमतो. हेच वाचक चळवळीतील सर्वात मोठे वास्तव आहे. म्हणूनच प्रा.गो.म. कुळकर्णी यांनी मांडलेले विचार अत्यंत महत्वपूर्ण ठरतात, ''कलावंत हा स्वत:ला कधीकधी 'वेडा' म्हणवून घेतो खरा, पण त्याच्या वेडेपणातही एक समकालीन सामाजिक, शहाणपण नांदत असते आणि हे शहाणपण म्हणजे समकालीन अभिरूचीचाच एक घटक असतो.''[८]

**वास्तव–**

अनेकदा आकलनातून असे लक्षात येते की ज्या ज्या परिवारांत परंपरेने धार्मिक, वैचारिक, वाड्मयीन आणि कलात्मक बैठक लाभलेली असते त्या त्या व्यक्ती अभिरूचीसंपन्न आणि त्यामुळे व्यक्तिमत्वानेही संपन्न होतात. त्याचा त्यांच्या कुटुंबाप्रमाणेच संपूर्ण समाजालाही लाभ होतो. त्यांच्या अभिरूचीच्या माध्यमातून सांस्कृतिक योदान घडते. मात्र पूर्वीच्या काळी माध्यम सेवा उपलब्ध नसतांना त्याचा अनुक्रमाने जसा विकास होताना दिसत नाही. एकतर इंटरनेट, स्मार्टफोनमुळे, वाहिन्यांमुळे वाचक खूप वाचत–बघत असले तरी सर्वप्रकारच्या लेखनाचा, कलांचा भडिमार वाचकांवर होताना दिसतो. त्यामुळे पाहिजे तशी सुदृढता त्या अभिरूचीला लाभलेली दिसत नाही. तशी ती असली तरी या अभिरूची वाचन

International Multidisciplinary E-Research Journal ISSN 2348-7143
Impact Factor - (CIF) 3.452, (SJIF) 3.009, (GIF) 0.676 (2013)
Special Issue 24 [illegible] December 2017
UGC Approved No. 40107 & 44117

सहसंबंधातील सुदृढतेचे प्रमाण कमी आहे. वास्तविक, सद्य अभिरुचीसंपन्नतेच्या जपणुकी असली ना [illegible] कालाशब्दांचा विद्यार्थी अत्यंत आस्वादक, रसिक असतो आणि अध्यापनात प्राध्यापकांना वाङ्मयप्रकार, समीक्षा शिकवताना अडथळ्यांना सामोरे जावे लागत नसते. स्वाभाविकच अशा अडथळ्यासाठी अभिरुचीला नियमन करणारे सांस्कृतिक, आर्थिक, वाङ्मयीन पर्यावरणाचे घटक आणि जागतिकीकरण हे सारेच कारणीभूत आहे. त्यावर वाचक चळवळ चालविणे वाचन प्रक्रियेशी संबंधित मनोरंजनात्मक उपक्रम राबविणे, व्याख्यान परिसंवादांना चालना देणे, व्याख्यानमाला चालविणे हे शैक्षणिक, सामाजिक आणि धार्मिक संस्थांच्या समूहातून साधणे शक्य आहे. एकूण, वाचन व अभिरुची यांच्या सहसंबंधातून निर्माण होणारे वास्तव हे भीषण नाही, परंतु विस्कळलेले आहे त्याची घडी आस्वादकांच्या माध्यमातून बसविता येणे शक्य आहे.

**संदर्भसूची :**

१. प्रा. अ.वा. कुळकर्णी : साहित्यविचार
२. प्रा. ग.श्री. जोग : मराठी वाङ्मयाभिरूचीचे विहंगमावलोकन
३. प्रा. ग. श्री. जोग : उ.नि.
४. संपा. प्रा. गो.म. कुलकर्णी; अभिरूची : ग्रामीण आणि नागर
५. प्रा. ग. श्री. जोग : उ.नि.
६. प्रा. अ.वा. कुळकर्णी : साहित्य विचार
७. गो.ग. आगरकर : संपा. गणेश प्रभाकर प्रधान : आगरकर लेखसंग्रह
८. प्रा. अ.वा. कुळकर्णी : : साहित्याविचार : संपा, द.दि. पुंडे, स्नेहल तावरे